**प्रेसनोट** धुळे

दि.२८/०४/२०१६

दिनांक २७/०४/२०१६ रोजी फिर्यादी विलास ज्ञानेश्वर भोवर उ.व.२९ व्यवसाय ट्रक ड्रायव्हर रा.शिरपुर ता.वेदवळी जि.वर्धा,हे आपले ताब्यातील ट्रक क्रंमाक सी.जी.०४/ई-८५१५ हिचेत सुाा १ कोटी रूपये किमतीचे केबल ड्रम,कॉपर कार्टुन भरून घेवून जात असतांना,त्यांना जळगाव दुरदर्शन केंद्र जवळ, रोडवर एकुण ८ आरोपीतांनी स्विप्ट कारने येवुन त्यांची ट्रक अडवुन,त्यांना पिस्तोलचा धाक दाखवुन, जिवेठार मारण्याची धमकी देवुन,त्या पैकी तिन आरोपींनी त्यांचे अपहरण करून,त्यांना जळगाव पासुन पहुर पोचारा,भडगाव व वलवाडी ता.भडगाव पर्यंत घेवुन जावून त्यांचे ताब्यातील एकुण १०,६०,३०००/-रूपये किंमतीची ऐवज ट्रकसह लुटून नेला होता.

सदर आरोपी हे फिर्यादी यांचे अपहरण करून वलवाडी ता.भडगाव येथे पोहचले असता, त्यांची स्विप्ट कार खराब झाली.तेंव्हा फिर्यादी यांनी त्यांचे तावडीतुन निघून पळाले असता आरोपीनी त्यांचा पाठलाग सुरू केला ते पाहुन गावक-यांनी त्या आरोपींना पकडुन लगतच्या पोलीस ठाण्यात जमा केले.सदर बाबत जळगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

सदर ट्रक पळवुन नेलेले उर्वरीत आरोपी इरफान मलीक,अमीन अन्सारी,भुषण चौधरी व अनिल भोई हे ट्रक सह फरार झाल्याने त्यांचा शोध घेणे कामी जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि/राहुल वाघ हे त्यांचे स्टॉप सह धुळे शहरात दाखल झाले.त्यांनी स्था.गु.शा.धुळे येथील पोलीसांची मदत मागीतली त्या प्रमाणे श्री.साहेबराव पाटील पोलीस अधिक्षक धुळे यांचे आदेशाने श्री.देवीदास शेळके पोलीस निरी.स्था. गु.शा.धुळे यांनी पोसई/नासिरखॉ पठाण व पोहेकॉ/राजेंद्र मोतीराम सोनवणे यांना योग्यते मार्गदर्शन करून त्यांचे मदतीस दिले.त्या प्रमाणे वरील पोलीस पथकाने वरील ट्रक शोध घेणे कामी धुळे शहर व परीसर भाग पिंजुन काढला.त्यांनी सदर ट्रक हा वरील मालासह अवधान एमआयडीसी परीसरातून शोधुन जळगाव स्था.गु.शाखाचे आलेले पोलीस अधिकारी यांचे ताब्यात दिला.